GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 10 | APRIL – 2021

''म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामाच्या ठिकाणी दिल्या जाणाऱ्या सुविधां व तरतुदीं विषयीची जागृकता''

मुकुंद पांडुरंगजी देशमुख
असिस्टंट मॅनेजर, करितास इंडीया, न्यु दिल्ली.

सारांश (Abstract)

भारतीय संविधानातील कलम 21 भारतीय नागरिकांना रोजगाराचा अधिकार प्रदान करते. असे असले तरी या हक्काच्या अंमलबजावणीसाठी कोणत्याही प्रकारची कायदेशीर तरतुद नव्हती. ही बाब लक्षात घेता सन 2005 मध्ये राष्ट्रीय रोजगार हमी अधिनियम पारित केला. या कायदयामध्ये ग्रामीण भागातील नागरिकांना वर्षातील किमान 100 दिवस अकुशल रोजगार पुरविण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. सोबतच श्रमाला प्रतिष्ठा व लाभार्थ्यांना संरक्षण पुरविण्याच्या दृष्टीने मगांराग्रारोह योजनेच्या नियमावली मध्ये कामाच्या ठिकाणी सविधा व संरक्षणार्थ अन्य तरतुदींचा समावेश केला आहे. या बाबींची मेळघाट मधील आदिवासी भागातील गावांत किती प्रमाणात अंमलबजावणी केली जाते व या तरतुदीं विषयी योजनेचे लाभार्थी जागृक आहेत का हे प्रस्तूत शोध निबंधातून अभ्यासण्यात आले आहे.

कि वर्ड– मगांराग्रारोह योजना, सुविधा, कायदेशीर तरतुदी, आदिवासी, जागृकता.

▪ प्रस्तावना–

म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मगांराग्रारोह) ही राष्ट्रीय पातळीवर स्वीकारली गेलेली आणि जागतिक पातळीवर नावाजली आणि अभ्यासली गेलेली ऐतिहासीक योजना आहे. बेरोजगारी तथा दारिद्रय निर्मुलणासाठी केंद्र तथा राज्य स्तरावर अनेक योजना सुरू केल्यात मात्र त्यांना फारसे यश प्राप्त होऊ शकले नाही. निश्चितच दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येमध्ये कमी आल्याचे आकडेवारीवरून दिसून येते मात्र गुणात्मक बदल होवू शकले नाही ही वास्तविकता नाकारता येत नाही. यादृष्टीने विचार केल्यास म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही लाभार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने फायदेशीर आहे त्यासोबतच त्यामाध्यमातून शाश्वत ग्रामीण विकासाचे ध्येय सुध्दा साधल्या जात आहे.

मगांराग्रारोह योजनेच्या अनेक वैशिष्टयांपैकी एक वैशिष्ट म्हणजे या योजनेअंतर्गत कामाच्या ठिकाणी लाभार्थ्यांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे तथा महिला, वृध्द, दिव्यांग यांच्यासाठी विशेष कामाची व्यवस्था करण्याची कायदेशीर तरतुद या योजनेमध्ये केली आहे. प्रस्तूत शोध निबंधात याविषयीचाच अभ्यास केला असून कायदा तथा योजनेमध्ये प्रावधान केले असतांना प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती होते आहे तसेच या सुविधा व तरतुदीविषयी लाभार्थी जागृक आहेत का यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

▪ शोधनिबंधाचे उददेश–

प्रस्तूत शोध निबंध पुढील तीन उद्देशावर आधारीत आहे–

1. म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या नियमावली मध्ये दर्शविलेल्या सुविधा व कायदेशीर तरतुदींवर प्रकाश टाकणे
2. मगांराग्रारोह योजने अंतर्गत प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जात असलेल्या सुविधांविषयी अभ्यास करणे
3. मगांराग्रारोह योजनेमध्ये लाभार्थ्यांसाठी असलेल्या तरतुंदीविषयी लाभार्थ्यांमध्ये जागृकता अभ्यासणे

▪ पध्दतीशास्त्र

प्रस्तूत शोध निबंध प्राथमिक तथ्यावर तसेच दुय्यम तथ्यावर आधारीत आहे. उद्देश क्रमांक एक ची पुर्तता करण्यासाठी दुय्यम तथ्याचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये शासनाने पारित केलेले परिपत्रक, अधिनियम, नियमावली यांचा आधार घेतला आहे. तसेच अन्य संशोधकांनी केलेल्या संशोधनाचा आढावा घेण्यात आला आहे. तर उद्देश क्रमांक दोन व तीन प्राथमिक तथ्यावर आधारीत आहे. यासाठी चिखलदरा तालुक्यातील चार गावातील एकूण 40 उत्तरदात्यांची निवड करण्यात आली होती. गावाची निवड करतांना सहेतूक पध्दतीचा उपयोग करण्यात आला होता. चिखलदरा तालुक्यामधील ज्या गावांमध्ये या योजनेची अंमलबजावणी होत आहे अशा बिबा, राहू, खडीमल, हतरू, या चार गावांची निवड करण्यात आली होती. तर उत्तरदात्यांची निवड करतांना असंभाव्यता नमुना पध्दतीमधील स्नोबॉल पध्दतीचा उपयोग करण्यात आला होता. यापध्दती अंतर्गत सर्वप्रथम योजनेमध्ये काम करीत असलेल्या लाभार्थ्याचा शोध घेवून तथ्य संकलीत केल्या गेले व त्याच्याकडून दुसऱ्या लाभार्थ्याची माहिती घेवून पुढे त्याच्याकडून तथ्य संकलीत केले. यानुसार प्रत्येक गावामधून 10 उत्तरदात्याची निवड केली असून एकूण 40 उत्तरदात्यांची निवड केली होती. तथ्य संकलनासाठी मुलाखत पध्दतीचा उपयोग करून 'मुलाखत अनुसूची' या तंत्राची मदत घेतल्या गेली. तसेच निरिक्षण पध्दतीची जोड देण्यात आली होती. निरिक्षण पध्दतीचा उपयोग करतांन प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणाला भेट देवून उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीची सत्यता पडताळल्या गेली.

1. म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या नियमावली मध्ये दर्शविलेल्या सुविधा व कायदेशीर तरतुदी

युपीए सरकारने सन 2005 मध्ये 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम' (नरेगा) पारीत केला. या अधिनियमाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या कुटुंबातील प्रत्येक प्रौढ व्यक्ती ज्याने वयाची 18 वर्ष पुर्ण केली आहे व तो अकुशल शारीरिक कार्य करण्याची इच्छा ठेवतो अशा व्यक्तींना आर्थिक वर्षात कमीत कमी 100 दिवस रोजगार मिळवून देण्याची हमी देतो. या कायदयामध्ये एकूण 34 कलमांचा अंतर्भाव केलेला आढळतो. तसेच दोन अनुसूची सोबत जोडलेल्या आहेत. त्यामध्ये कलमांच्या आधारे व्यवस्थेचे प्रारूप स्पष्ट केले आहे.

नरेगा कायदयातील कलम 4(1) ची अमंलबजावणी करण्याच्या हेतून योजना आखल्या गेली. ती प्रारंभी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणून ओळखल्या जात होती. पुढे गांधी जयंतीचे निमित्त साधून 2 ऑक्टोबर 2009 पासून ही योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मगांराग्रारोह) या नावाने ओळखल्या जाऊ लागली.

▪ मगांराग्रारोह योजनेअंतर्गत कामाच्या ठिकाणी दिल्या जाणाऱ्या सुविधा

1. कामाच्या ठिकाणी पिण्याची पाणी
2. आराम करण्यासाठी शेड
3. प्रथमोपचार पेटी
4. शिशुगृह सुविधा
5. कार्य करीत असतांना महिलांसोबत सहा वर्षापेक्षा कमी वयाचे बालक असतील तर त्यांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक (दायी) महिला उपलब्ध करून दिल्या जाते.
6. कामाच्या संदर्भात तक्रार अथवा शंका असल्यास तक्रार करण्यासाठी तक्रार पेटी

▪ मगांराग्रारोह योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी असलेल्या तरतुदी

1. अर्ज केल्यानंतर 15 दिवसात जॉब कार्ड उपलब्ध करून देणे
2. कामाची मागणी केल्यानंतर 15 दिवसात रोजगार उपलब्ध करून देणे
3. रोजगार उपलब्ध करून देणे शक्य नसल्यास बेरोजगार भत्ता उपलब्ध करून देणे
4. कामाचे अंतर 5 किलो मिटर पेक्षा अधिक असल्यास मजुरीच्या 10 टक्के अतिरिक्त मजुरी उपलब्ध करून देणे
5. लाभार्थी राज्य रोजगार हमी परिषदेचा सदस्य होण्यास पात्र
6. वृध्द व विकलांग व्यक्तीसाठी राखीव कामाची तरतूद
7. वयोवृध्द विकलांग व्यक्तींसाठी स्वतंत्र दरपत्रक
8. हजेरीपट पाहण्याची तरतूद
9. समान कामास समान वेतन
10. कामाच्या ठिकाणी लाभार्थ्याचा मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास सानुग्रह अनुदान
11. कामाच्या ठिकाणी लाभार्थ्यासोबत असलेल्या लहान मुलासोबत इजा, अपघात, मृत्यू, विकलांगता, असा कोणताही प्रकार घडल्यास शासन ठरविल त्याप्रमाणे ते अनुदान तथा वैदयकीय मोफत उपचार
12. गर्भवती महिलांसाठी विशेष प्रावधान
13. योजनेअन्वये रोजगारावर असतांना संतती नियमन शस्त्रक्रिया किंवा अन्य शस्त्रक्रिया झालेल्या व्यक्तीला विश्रांती कालावधीत दैनंदिन वेतनाइतकी रक्कम सानुग्रह प्रदान करणे
14. सामाजिक अंकेक्षणात सहभागी होण्याची तरतूद

2. कामाच्या ठिकाणी दिल्या जात असलेल्या प्रत्यक्ष सुविधा

उपरोक्त मुदयाची माहिती प्राथमिक तथ्यावर आधारीत असून उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून साधलेल्या संवादाद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण केलेले आहे.

▪ उत्तदात्याची वैयक्तीक माहिती–

सारणी 1 मध्ये प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जे लाभार्थी काम करीत असल्याचे आढळून आले त्यांची वैयक्तीक माहिती संकलीत केलेली आहे

सारणी 1
उत्तरदात्यांची वैयक्तीक माहिती

अक	वैयक्तिक माहिती	पर्याय	वारंवारिता	टक्केवारी
1	लिंग	स्त्री	28	70.00
		पुरूष	12	30.00
2	वयोगट	18 ते 35 वर्ष	04	10.00
		36 ते 60 वर्ष	30	75.00
		60 वर्षावरील	06	15.00
3	शिक्षण	निरक्षर	34	85.00
		केवळ लिहीता वाचता येणे	02	05.00
		प्राथमिक	04	10.00
4	जमातीचा प्रकार	कोरकू	32	80.00
		गोंड	04	10.00
		बलई	02	05.00
		गवळी	02	05.00
5	वार्षिक उत्पन्न	रू.30 हजार पेक्षा कमी	16	40.00
		रू.30 ते 40 हजार	18	45.00
		रू.41 ते 50 हजार	04	10.00
		रू.51 ते 60 हजार	02	05.00
6	रेषन कार्डचा प्रकार	अंत्योदय	16	40.00
		बिपीएल	18	45.00
		एपीएल	06	15.00

सारणी 1 मध्ये मगांराग्रारोह योजनेमध्ये सहभागी लाभार्थ्यांची वैयक्तीक माहिती दर्शविण्यात आली आहे. त्यानुसार शोध निबंधासाठी अध्ययनात समाविष्ट एकूण 40 उत्तरदात्यांपैकी 28 स्त्रीया होत्या त्यांचे शेकडा प्रमाण 70 होते. तर पुरूषांची संख्या 12 असून त्यांचे शेकडा प्रमाण 30 होते. यावरून असा निष्कर्ष निघतो की पुरूषांच्या तुलनेत स्त्रीयांनी योजनेतील कामाला अधिक प्रमाणात प्राधान्य दिले आहे

वयोगट–

अध्ययनात समाविष्ट एकूण 40 उत्तरदात्यांपैकी 04 उत्तरदात्यांचा वयोगट 18 ते 35 वर्ष होता. तर 36 ते 60 वर्ष वयोगटातील उत्तरदात्यांची संख्या 30 होती त्यांचे शेकडा प्रमाण 75.00 होते तसेच 60 वर्षावरील उत्तरदात्यांची संख्या 06 होती त्यांचे शेकडा प्रमाण 15.00 होते.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, युवकांच्या तुलनेत प्रौढ वयोगटातील व्यक्ती योजनेतील कामात अधिक प्रमाणात सहभागी आहेत.

शिक्षण–

अध्ययनात समाविष्ट उत्तरदात्यांचे शिक्षण अभ्यासले असता सर्वाधिक म्हणजेच 85.00 टक्के उत्तरदाते निरक्षर होते. तर केवळ 10 टक्के उत्तरदाते प्राथमिक पर्यंत शिक्षण घेतलेले होते. तसेच 05.00 टक्के उत्तरदात्यांना केवळ लिहीता वाचता येत होते.

यावरून असा निष्कर्ष निघतो मगांराग्रारोह योजनेत काम करीत असलेल्या व्यक्तींमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे

जमातीचा प्रकार– असे दर्शवितो की, मगांराग्रारोह योजनेत काम करणाऱ्या जमातींमध्ये कोरकू जमातीचे 80.00 टक्के, गोंड जमातीचे 10.00 टक्के बलई–05.00 टक्के व गवळी समाजाचे 05.00 टक्के उत्तरदात्यांचा समावेश होता.

वार्षिक उत्पन्न– अभ्यासले असे दिसून आले की, जवळपास 85.00 टक्के लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रू.40 हजारच्या आत होते. रू.41 ते 50 हजार रूपयाच्या दरम्यान उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या 04 (10.00 टक्के) असून रू.51 ते 60 हजार उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या 02 (05.00)होती.

रेशन कार्डचा प्रकार– असे दर्शवितो की 40 टक्के लाभार्थी अंत्योदय योजनेचा लाभ घेत होते. बिपीएल रेषन कार्ड धरकांचे शेकडा प्रमाण 45.00 होते. तर 15 टक्के लाभार्थी एपीएल कार्ड धारक होते.

यावरून असा निष्कर्ष निघतो की बहुतांश उत्तरदाते दारिद्रय रेषेखाली जगत असून दारिद्रय रेषेवरील उत्तरदात्यांची संख्या अतिशय कमी दिसून येते.

- **कामाच्या ठिकाणी सुविधांची उपलब्धता –**

सारणी 2
कामाच्या ठिकाणी सुविधांची उपलब्धता

अक	कामाच्या ठिकाणी सुविधा	सुविधांची उपलब्धता		एकूण
		आहे	नाही	
1	कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी	10(25.00)*	30(75.00)	40(100)
2	आराम करण्यासाठी शेड	10(25.00)	30(75.00)	40(100)
3	प्रथमोपचार पेटी	36(90.00)	04(10.00)	40(100)
4	शिशुगृह सुविधा	00(00.00)	40(100)	40(100)
5	कार्य करीत असतांना महिलांसोबत सहा वर्षापेक्षा कमी वयाचे बालक असतील तर त्यांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक (दायी) महिला उपलब्ध करून दिल्या जाते.	00(00.00)	40(100)	40(100)
6	कामाच्या संदर्भात तक्रार अथवा शंका असल्यास तक्रार करण्यासाठी तक्रार पेटी	20(50.00)	20(50.00)	40(100)

*(कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते)

सारणी 2, कामाच्या ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जात असलेल्या सुविधांची स्थिती दर्शविते. त्यानुसार अध्ययनात समाविष्ट एकूण 40 उत्तरदात्यांपैकी 10(25.00टक्के) उत्तरदाते कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिल्या जाते असे दर्शवितात.

आराम करण्यासाठी शेड उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे 10(25.00टक्के) उत्तरदाते दर्शवितात.

प्रथमोपचार पेटीची सुविधा असल्याचे 36(90.00टक्के) उत्तरदाते दर्शवितात.

शिशु गृह उपलब्ध करून दिल्या जाते असे दर्शविणारा एकही उत्तरदाता आढळून आला नाही.

कार्य करीत असतांना महिलांसोबत सहा वर्षापेक्षा कमी वयाचे बालक असतील तर त्यांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक (दायी) महिला उपलब्ध करून दिल्या जाते असे दर्शविणारा एकही उत्तरदाता आढळून आला नाही.

कामाच्या संदर्भात तक्रार अथवा शंका असल्यास तक्रार करण्यासाठी तक्रार पेटी उपलब्ध असल्याचे 20(50टक्के) उत्तरदाते दर्शवितात.

3. मगांराग्रारोह योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी असलेल्या तरतुदी विषयीची जागृकता

सारणी 3
मगांराग्रारोह योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी असलेल्या तरतुदी विषयीची जागृकता

अक्र	मगांराग्रारोह योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी असलेल्या तरतुदी	त्रतुदींविषयी जागृकता		एकूण
		टाहे	नाही	
1	अर्ज केल्यानंतर 15 दिवसात जॉब कार्ड उपलब्ध करून देण्याची तरतूद	30(75.00)*	10(25.00)	40(100)
2	कामाची मागणी केल्यानंतर 15 दिवसात रोजगार उपलब्ध करून देणे	35(87.50)	05(12.50)	40(100)
3	रोजगार उपलब्ध करून देणे शक्य नसल्यास बेरोजगार भत्ता उपलब्ध करून देणे	18(45.00)	22(65.00)	40(100)
4	कामाचे अंतर 5 किलो मिटर पेक्षा अधिक असल्यास मजुरीच्या 10 टक्के अतिरिक्त मजुरी उपलब्ध करून देणे	12(30.00)	28(70.00)	40(100)
5	लाभार्थी राज्य रोजगार हमी परिषदेचा सदस्य होण्यास पात्र	04(10.00)	36(90.00)	40(100)
6	वृध्द व विकलांग व्यक्तीसाठी राखीव कामाची तरतूद	02(05.00)	38(95.00)	40(100)

7	वयोवृध्द विकलांग व्यक्तींसाठी स्वतंत्र दरपत्रक	02(05.00)	38(95.00)	40(100)
8	हजेरीपट पाहण्याची तरतूद	06(15.00)	34(85.00)	40(100)
9	समान कामास समान वेतन	40(100)	00(00.00)	40(100)
10	कामाच्या ठिकाणी लाभार्थ्याचा मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास सानुग्रह अनुदान	04(10.00)	36(90.00)	40(100)
11	कामाच्या ठिकाणी लाभार्थ्यासोबत असलेल्या लहान मुलासोबत इजा, अपघात, मृत्यू, विकलांगता, असा कोणताही प्रकार घडल्यास शासन ठरविल त्याप्रमाणे ते अनुदान तथा वैदयकीय मोफत उपचार	00(00.00)	40(100)	40(100)
12	गर्भवती महिलांसाठी विशेष प्रावधान	05(12.50)	35(87.50)	40(100)
13	योजनेअन्वये रोजगारावर असतांना संतती नियमन शस्त्रक्रिया किंवा अन्य शस्त्रक्रिया झालेल्या व्यक्तीला विश्रांती कालावधीत दैनंदिन वेतनाइतकी रक्कम सानुग्रह प्रदान करणे	02(05.00)	38(95.00)	40(100)
14	सामाजिक अंकेक्षणात सहभागी होण्याची तरतूद	10(25.00)	30(75.00)	40(100)

*(कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते)

सारणी 3 मध्ये मगांराग्रारोह योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी असलेल्या तरतुदींविषयीची जागृकता अभ्यासण्यात आली आहे. मगांराग्रारोह योजतील तरतुदीनुसार, अर्ज केल्यानंतर 15 दिवसात जॉब कार्ड उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे या तरतुदीविषयी 30(75.00टक्के) उत्तरदाते जागृक असल्याचे दिसून आले तर 10(25.00टक्के) उत्तरदाते या तरतुदीविषयी अनभिज्ञ होते.

कामाची मागणी केल्यानंतर 15 दिवसात रोजगार उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे या तरतुदी विषयी 35(87.50 टक्के) उत्तरदाते जागृक होते, तर 05(12.50 टक्के) उत्तरदाते जागृक नसल्याचे आढळून आले.

रोजगार उपलब्ध करून देणे शक्य नसल्यास बेरोजगार भत्ता उपलब्ध करून देणे बधनकारक आहे, या तरतुदीविषयी 18(45.00 टक्के) उत्तरदाते जागृक होते. तर 22(65.00 टक्के) उत्तरदाते जागृक नव्हते.

कामाचे अंतर 5 किलो मिटर पेक्षा अधिक असल्यास मजुरीच्या 10 टक्के अतिरिक्त मजुरी उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे, या तरतुदीविषयी 12(30.00 टक्के) उत्तरदाते जागृक होते. तर 28(70.00 टक्के) उत्तरदाते जागृक नव्हते.

लाभार्थी राज्य रोजगार हमी परिषदेचा सदस्य होण्यास पात्र असतो, या तरतुदीविषयी 04(10.00 टक्के) उत्तरदाते जागृक होते. तर 36(90.00 टक्के) उत्तरदाते जागृक नसल्याचे आढळून आले.

मगांराग्रारोह योजनेतील कामामध्ये वृध्द व विकलांग व्यक्तीसाठी राखीव कामाची तरतूद असते, याविषयी 02(05.00 टक्के)उत्तरदाते जागृक होते. तर 38(95.00 टक्के) उत्तरदाते जागक नसल्याचे आढळून आले

वयोवृध्द विकलांग व्यक्तींसाठी स्वतंत्र दरपत्रक असावे या तरतुदीविषयी 02(05.00 टक्के) उत्तरदाते जागृक होते तर 38(95.00 टक्के) उत्तरदाते जागृक नव्हते.

लाभार्थ्याला हजेरीपट पाहण्याची तरतूद करण्यात आली आहे या तरतुदीविषयी 06(15.00 टक्के) उत्तरदाते जागृक होते तर 34(85.00 टक्के) उत्तरदाते जागृक नव्हते

मगांराग्रारोह योजनेमध्ये समान कामास समान वेतन दिल्या जाते या तरतुदी विषयी सर्वच म्हणजे 40(100 टक्के) उत्तरदाते जागृक होते. तर एकही लाभार्थी या तरतुदी विषयी अनभिज्ञ आढळून आला नाही.

कामाच्या ठिकाणी लाभार्थ्याचा मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास सानुग्रह अनुदान या संदर्भातील तरतुदी विषयी 04(10.00 टक्के) उत्तरदाते जागृक होते. तर 36(90.00 टक्के) उत्तरदाते जागृक नव्हते.

कामाच्या ठिकाणी लाभार्थ्यासोबत असलेल्या लहान मुलासोबत इजा, अपघात, मृत्यू, विकलांगता, असा कोणताही प्रकार घडल्यास शासन ठरविल त्याप्रमाणे ते अनुदान तथा वैदयकीय मोफत उपचार या तरतुदी विषयी एकही उत्तरदाता जागृक असल्याचे आढळून आला नाही. म्हणजे 40(100 टक्के) उत्तरदाते या तरतुदी विषयी अनभिज्ञ होते.

गर्भवती महिलांसाठी विशेष प्रावधान या तरतुदी विषयी 05(12.50 टक्के) उत्तरदाते जागृक होते. तर 35(87. 50 टक्के)उत्तरदाते जागृक नव्हते.

योजनेअन्वये रोजगारावर असतांना संतती नियमन शस्त्रक्रिया किंवा अन्य शस्त्रक्रिया झालेल्या व्यक्तीला विश्रांती कालावधीत दैनंदिन वेतनाइतकी रक्कम सानुग्रह प्रदान करणे या तरतुदीविषयी केवळ 02(05.00 टक्के) उत्तरदाते जागृक होते. तर 38(95.00 टक्के) उत्तरदाते जागृक आढळून आले नाही.

सामाजिक अंकेक्षणात सहभागी होण्याची तरतूद या संदर्भात 10(25.00 टक्के) उत्तरदाते जागृक असल्याचे आढळून आले तर 30(75.00 टक्के) उत्तरदाते जागृक नव्हते.

सारणीत स्पष्ट दिसून येते की, बहुतांश तरतुदींविषयी लाभार्थी जागृक नाहीत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, मगांराग्रारोह योजनेत लाभार्थ्यांच्या हिताच्या अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. मात्र त्या तरतुदी विषयी अधिकांश लाभार्थी जागृक नाहीत.

▪ निष्कर्ष

1. मगांराग्रारोह योजने मध्ये सहभागी लाभार्थ्यांमध्ये पुरूषांच्या तुलनेत महिलांचा सहभाग अधिक आहे. योजनेच्या उददेशांमध्ये महिला सबलिकरणाची जी चर्चा करण्यात आली आहे ती मेळघाट सारख्या आदिवासी भागामध्ये हा उददेश सफल होतांना दिसतो आहे. योजनेमध्ये सहभागी लाभार्थी सर्वाधिक प्रमाणात निरक्षर असून दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहे. निश्चित त्यांच्यासाठी ही योजना वरदान ठरू शकते.

2. अकुशल श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे हा सुध्दा मगांराग्रारोह योजनेचा उददेश आहे. त्याअनुषंगाने योजनेतील कामाच्या ठिकाणी अनेक प्रकारच्या सुविधां प्रदान करण्यासंदर्भात योजनेच्या नियमावली मध्ये समावेश करण्यात आला आहे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणाचे निरक्षण तथा लाभार्थ्यांच्या मुलाखतीच्या आधारे असे दिसून आले की, पिण्याचे पाणी सोडले तर अन्य सुविधांचा अभाव असतो तर काही ठिकाणी प्राथमिक उपचार पेटी आढळून आली.

3. लाभार्थ्यांना संरक्षण प्रदान करण्याच्या हेतूने योजनेमध्ये अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत, असे असले तरी त्या तरतुदीं विषयी लाभार्थी जागृक नसल्याचे आढळून आले. आदिवासींचा मागासलेपणा, शिक्षणाचा अभाव, प्रशासकीय कर्मचाऱ्यांची नाकर्तेपणा ही कारणे त्यामागे असल्याचे दिसून आले.

▪ संदर्भ ग्रंथ

Arya, A.P.(2017).Study on Mahatma Gandhi national rural employment guarantee act (MGNREGA) and women empowerment with reference to Kerala.***Journal of Advanced Research in Dynamical and Control Systems*** 9(5):74-82 January

Das Rima. And Mond, Biraj Kant. (2019). The Micro Level Study On Impact Analysis Of Mgnrega To Uplift Rural Sector Of South 24 Parganas.***Geoinformatics for Sustainable Environment Management*** . (Vol-II) (pp.219-238).March-

Kiruthika.A.(2017). A Study with the Employee attitudein a MGNREGA worksiteat Virudhunagar District. ***IJARIIE***. Vol-3 Issue-1 www.ijariie.com1553

Shaik. Sharief, Mahaboob. (2013).A study on impact of mahatma gandhi national rural employment guarantee act MGNREGA on rural community in Andhra Pradesh.***Unpublished Ph.D.Thesis.*** Department of Population Studies, Sri Venkateswara University.

Thanulingom. T. (2007). Research Methodology. Mumbai. Himalaya Publishing House.

Vigneswar V, Kirubagaran K. (2018). A Study On Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act And Social Capital: An Economic Analysis. ***International Journal of Pure and Applied Mathematics.*** Volume- 120 No. 5, 3615-3624. http://www.acadpubl.eu/hub/

मुकुंद पांडुरंगजी देशमुख
असिस्टंट मॅनेजर, करितास इंडीया, न्यु दिल्ली.